Review Of Research
Vol. 3, Issue. 3, Dec. 2013
Impact Factor 2.1002(UIF)
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

ORIGINAL ARTICLE

# वर्धा व नागपूर जिल्हा आदिवासी विकास विभागांतर्गत राबविल्या जाणा-या आर्थिक विकास योजनांचे तुलनात्मक अध्ययन

**प्रा. शंकर गणपतराव बोंडे**
संशोधनकर्ता , आर. एस. बिडकर कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, हिंगणघाट

**सारांश**

प्रस्तुत संशोधनात वर्धा व नागपूर जिल्ह्यातील अनुक्रमे ४२० व ४८० आदिवासी नागरिकांकडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला. यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता **Two sample Z test** व **Two Proportion Z test** या सांख्यिकीय चाचण्यांचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले.

**प्रस्तावणा**

आधूनिक भारतीय समाजाचा समाजशस्त्रीय विचार करताना ‘शहरी समाज’ व ‘ग्रामीण समाज’ असे विभाजन केले जाते. असे विभाजन करताना एका महत्वाच्या परिसराकडे आणि समूहाकडे आपले जरा दुर्लक्ष होते. तो म्हणजे रानावनात, द-याकपा-यात राहणारा आदिवासी समाज होय.

आदिम समाजाच्या अभ्यासाचे महत्व सामाजिक मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर जीवनाच्या विविध क्षेत्रातील व्यक्तींना वाटत असलेल्या आदिवासींच्या अभ्यासाचे महत्व लक्षात घेणे गरजेचे ठरते. प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते, कृषी आधिकारी, धर्मप्रसारक, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादी विविध क्षेत्रातील व्यक्ती व संस्था आदिम जीवनाचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

Review Of Research
Vol. 3, Issue. 3, Dec. 2013
Impact Factor 2.1002(UIF)
ISSN:-2249-894X Available online at www. lbp.world

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे आदिवासी विकासाच्या दृष्टिकोणातून तयार करण्यात आले आहे व या अंतर्गत विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांपासून आदिवासींना प्राप्त झालेल्या लाभाचे अध्ययन व्यापक प्रमाणात करण्यात आले नाही. याच धर्तीवर वर्धा व नागपूरजिल्ह्यात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची परिणामकारकता किती व कोणत्या प्रमाणात आहे व या प्रकल्पांतर्गत लाभ घेतांना लाभार्थ्यांना कोणत्या अडचणी व समस्या येतात याचा शोध घेण्याचा विचार संशोधकाला आला. याच हेतूने संशोधकाने खालील विषय अध्ययना करिता निवडला.

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत खालील योजनांसंबंधी जागरूकता**

**सारणी क्रमांक १:** वर्धा व नागपूर जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत खालील आर्थिक विकास योजनांसंबंधी जागरूकतेची माहिती

| योजना | वर्धा | | | | यवतमाळ | | | | Z | P |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | होय | टक्के | नाही | टक्के | होय | टक्के | नाही | टक्के | | |
| कन्यादान योजना | १३६ | ३२.४ | २८४ | ६७.६ | १२१ | २५.२ | ३५९ | ७४.८ | **2.3767** | **0.01732 (<0.05)** |
| आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | ४१७ | ९९.३ | ३ | ०.७ | ३४९ | ७२.७ | १३१ | २७.३ | **11.1741** | **0.000 (<0.0001)** |
| दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप | २१५ | ५१.२ | २०५ | ४८.८ | १९२ | ४०.० | २८८ | ६०.० | **3.3651** | **0.00076 (<0.001)** |
| आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना | १८९ | ४५.० | २३१ | ५५.० | ९८ | २०.४ | ३८२ | ७९.६ | **7.8947** | **0.000 (<0.0001)** |
| सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना | २१४ | ५१.० | २०६ | ४९.० | ११७ | २४.४ | ३६३ | ७५.६ | **8.2491** | **0.000 (<0.0001)** |
| **Z** | **7.8649** | | | | **-18.6484** | | | | | |
| **P** | **0.000 (<0.0001)** | | | | **0.000 (<0.0001)** | | | | | |

Z- Z मूल्य; P- P मूल्य (सार्थकता)

उपरोक्त **सारणी क्रमांक १** मध्ये वर्धा व नागपूरजिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत खालील आर्थिक विकास योजनांसंबंधी जागरूकतेची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत

दर्शविलेल्या माहितीनूसार वर्धा जिल्ह्यातील ९९.० टक्के आदिवासी उत्तरदाते आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेबाबत जागरूक असून, ५१.२ टक्के आदिवासी उत्तरदाते दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप या योजनेबाबत जागरूक होते. त्याचप्रमाणे सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना व कन्यादान योजना याबाबत जागरूक असणाऱ्या वर्धा जिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची टक्केवारी अनुक्रमे ५१.० टक्के, ४५.० टक्के व ३२.४ टक्के होती.

तसेच नागपूर जिल्ह्यातील ७२.७ टक्के आदिवासी उत्तरदाते आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती या योजनेबाबत जागरूक असून, ४० टक्के आदिवासी उत्तरदाते दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप या योजनेबाबत जागरूक होते. त्याचप्रमाणे कन्यादान योजना, सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना याबाबत जागरूक असणाऱ्या नागपूरजिल्ह्यातील आदिवासी उत्तरदात्यांची टक्केवारी अनुक्रमे २५.२ टक्के, २४.४ टक्के व २०.४ टक्के होती.

उपरोक्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, वर्धा जिल्ह्यातील महत्वपूर्णपणे **($Z=7.8649$; $P<0.0001$)** अधिक आदिवासी नागरिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आर्थिक विकास योजनांबाबत जागरूक आहेत, तर नागपूर जिल्ह्यातील सार्थकरित्या **($Z=-18.6484$; $P<0.0001$)** अधिक आदिवासी नागरिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आर्थिक विकास योजनांबाबत जागरूक नसल्याचे निदर्शनास आले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत योजनांचा तपशिलवार विचार केला असता असे निदर्शनास येते की, कन्यादान योजना **($Z=2.3767$; $P<0.05$)**; आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती **($Z=11.1741$; $P<0.0001$)**; दारिद्र्य रेषे खालील आदिवासी कुटुंबांना दुभत्या जनावरांचे वाटप **($Z=3.3651$; $P<0.001$)**; आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना **($Z=7.8947$; $P<0.0001$)** व सुवर्ण मोहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना **($Z=8.2491$; $P<0.0001$)** या सर्व योजनांबाबत नागपूरजिल्ह्यातील आदिवासी नागरीकांच्या तुलनेत वर्धा जिल्ह्यातील आदिवासी नागरीक महत्वपूर्णपणे **($P<0.05$)** अधिक जागरूक आहेत. परिणाम हे देखील दर्शवितात की, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कन्यादान योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना या योजनांसंदर्भात वर्धा व नागपूर या दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी नागरीकांदरम्यान जागरूकता नाही.

## निष्कर्ष

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कन्यादान योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना या योजनांसंदर्भात वर्धा व नागपूरया दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी नागरीकांदरम्यान जागरूकता नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कन्यादान योजना व आदिवासी महिलांकरिता अर्थसहाय्य बचतगटाची योजना या योजनांसंदर्भात वर्धा व नागपूरया दोन्ही जिल्ह्यातील बहुतांश आदिवासी नागरीकांदरम्यान जागरूकता नाही.

## संदर्भ ग्रंथ सुची

१. डॉ. एस. जी. देवगांवकर (२०११), आदिवासी विकास प्रशासन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
२. मेश्राम प्रा. सुरेश (२०००), प्रात्याशिक सामाजिक संशोधन, कृष्णाचंद्र एजन्सीज, लक्ष्मीनगर, नागपूर.
३. उंबरकर डॉ. दिनकर (२००७), कोरकु आदिवासी, अवैत प्रकाशत गजानन पेठ, अकोला
४. मांडवकर भाऊ (१९६६), कोलाम, सेवा प्रकाशन रूख्मिणीनगर, विस्तार वर्धा
५. मांडवकर भाऊ (१९९७), आदिवासी, सेवा प्रकाशन वर्धा
६. शिरोळे डॉ. धैर्यशिल (२००२), आदिवासी कथा व व्यथा
७. खडसे डॉ. भा.की. (१९९९), सामाजिक मानवशास्त्र, मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर
८. पाटे सुमन (१९९९), सामाजिक मानवशास्त्र विश्व पब्लिशर्स ॲंड डिस्ट्रीब्युटर्स
९. कऱ्हाडे डॉ. बी.एम. (२००७), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲंड कं. पब्लिशर्स
१०. घाटोळे प्रा.रा.ना. (१९९०), समाजशास्त्र संशोधन तत्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर – १०
११. हेमणे प्रविणकुमार (२००८), जनरल नॉलेज जालु घडामोडी, विनर्स प्रकाशन, धामणगांव रोड, यवतमाळ
१२. विविध योजना व त्याची माहिती २००६ ते २०१२ अप्पर आयुक्त, आदिवासी विकास वर्धा व यवतमाळ
१३. बेंटन विल्यम (१९७३), एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका, व्हॅल्यूम–१०. प्रिंटेड इन द. यू.एस. ए.,
१४. बोबडे प्रकाश, लोटे रा. ज. (१९९३), सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.